उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५९२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53

वर्ष ३१ | पुणे, बुधवार १ डिसेंबर, १९६५ | अंक ११



## अल्पबचत योजना आता अधिक लाभदायक

वैयक्तिक खात्यावरील २५ हजार रुपयांपर्यंत व संयुक्त खात्यावरील ५० हजार रुपयांपर्यंतच्या ठेवीवर करमुक्त ४ टक्के व्याज. कितीही वेळा पैसे काढता येतात. चेकबुकची सोय उपलब्ध. सार्वजनिक संस्थांच्या खात्यावर सरसकट ३½ टक्के करमुक्त व्याज व पैसे ठेवण्याला मर्यादा नाहीं.

8%

### संचित मुदतीच्या ठेवीची योजना

१ एप्रिल १९६५ रोजी अथवा त्यानंतर उघडण्यात येणाऱ्या संचित मुदतीच्या खात्यावर आता मुदती-अंती करमुक्त बोनसही मिळेल.

दरमहा १० रुपये जमा करणाऱ्यास ५ वर्षांच्या खात्यावर १५ रुपये, १० वर्षांच्या खात्यावर ५० रुपये आणि १५ वर्षांच्या खात्यावर १०० रुपये बोनस मिळेल. सर्व ठेवींच्या बाबतीत याच प्रमाणात बोनस मिळेल. १० आणि १५ वर्षांची खाती उघडणाऱ्या व्यक्तींना प्राप्तीकरात सवलत मिळते.

### नवीन बचत योजना 8%

### राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटे

[प्रारंभिक विक्री]

ही सर्टिफिकिटे १०, १०० आणि १००० रुपयांच्या दर्शनी किंमतीत बचत बँकेचा व्यवहार करणाऱ्या सर्व पोस्ट ऑफिसातून १ जून १९६५ पासून विकत मिळतील.

या सर्टिफिकिटांची मुदत १० वर्षांची राहील व मुदतीअंती त्यावर ८ टक्के दराचे व्याज मिळेल, म्हणजे १००० रुपयांचे १८०० रुपये मिळतील. व्याजावर प्राप्तीकर आकारला जाईल.

पांच वर्षे मुदतीचे बिनव्याजी बक्षीस रोखे देऊन त्याबद्दल तुम्हांला ही सर्टिफिकिटे घेता येतील.

### करमुक्त उत्पन्नासाठी पुढील दीर्घ मुदतीच्या सर्टिफिकिटांत पैसे गुंतवा

* १० वर्षांची डिफेन्स डिपॉझिट सर्टिफिकिटे. यावर ४.५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.
* १२ वर्षांची राष्ट्रीय संरक्षण सर्टिफिकिटे. यावर ६.२५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.

SMALL SAVINGS ★ SERVE THE STATE & YOUR FAMILY

### राष्ट्राच्या विकासासाठी आणि तुमच्या सुरक्षिततेसाठी अल्पबचतीत अधिकाधिक रक्कम गुंतवा

अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई-३२

**कोट्यवधि रुपयांचा काळा पैसा**—आयकर खात्याच्या अधिकाऱ्यांनी कलकत्ता शहरांतील ५ धनिकांच्या घरांवर आणि कचेऱ्यांवर अचानक धाड घालून कोट्यवधि रुपयांचा काळा पैसा हस्तगत केला. ज्यांच्यावर हे छापे घालण्यात आले त्यांनी हा धंदा आपण करीत असल्याची कबुलीही दिली. त्यांच्या हिशेबाच्या पुस्तकांची आता कसून तपासणी चालू आहे. ह्या लोकांपैकी काहीजण कलकत्त्यामधील प्रमुख उद्योगपती व धंदेवाले आहेत.

**ब्रिटनमध्ये स्थायिक झालेले लोक**—ह्या वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांच्या कालावधींत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतून आलेले ४३ हजार नागरिक ब्रिटनमध्ये स्थायिक झाले, अशी माहिती ब्रिटिश सरकारने अधिकृत रीत्या जाहीर केली आहे. गेल्या वर्षी कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील ५५,९०० नागरिक ब्रिटनमध्ये स्थानिक झाले होते. त्याशिवाय आणखी १९,२११ लोकही ब्रिटनमध्ये कायमचे राहण्यास आले होते.

**हंगेरीकडून मदत**—भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत असलेल्या अनेक प्रकारच्या उद्योगधंद्यांना हंगेरीकडून मदत मिळण्याचा संभव आहे. उभयता देशांत करण्यात आलेल्या कराराप्रमाणे हंगेरीकडून २ हजार दूरचित्रवाणीची यंत्रे भारतांत आयात करण्यात येत आहेत. आणखी २ हजार यंत्रेही लवकरच मार्गस्थ करण्यात येणार आहेत. कानपूर येथे हंगेरीच्या मदतीने दूरचित्रवाणीची यंत्रे तयार करण्याची खटपट चालू आहे.

**गोव्यात खताचा कारखाना**—बिर्ला उद्योग गट एका अमेरिकन कंपनीच्या सहकार्याने गोव्यात रासायनिक खताचा कारखाना उभारण्याच्या खटपटीत आहे. कारखाना झुआरी नदीच्या काठी काढण्यात येणार असून त्यासाठी २६ कोटी रुपये खर्च येणार आहे. कारखान्यासाठी लागणारी जमीन मिळविण्याचे काम चालू झाले आहे. कारखान्याच्या उभारणीच्या कामास पुढील वर्षाच्या प्रारंभी सुरवात होईल.

**सिनेकलावंतांनी १७ लाख रुपये जमाविले**—दक्षिण भारतामधील सुप्रसिद्ध सिनेकलावंत श्री. शिवाजी गणेशन् ह्यांनी जवानांच्या मदतीसाठी ७६ कलावंतांचे एक पथक तयार केले आणि त्यांचे कार्यक्रम दक्षिण भारतामधील काही मोठ्या शहरी करून दाखविले. त्यांच्या ह्या प्रयत्नाला चांगला प्रतिसाद मिळाला. पथकाने जवानांच्या हितसंवर्धनासाठी १७ लाख रु. जमविले.

**प्राणिसृष्टींतील वाटेकरी**—शेतांत पैदा होणाऱ्या धान्यापैकी किती धान्य प्राणिसृष्टीच्या मुखी पडते हे अजमावण्यासाठी भारत सरकारच्या अन्नखात्याने निरनिराळया प्राण्यांवर नजर ठेवली होती. त्यावरून असे दिसून आले की, एका दिवसात कावळा ३० ग्रॅम धान्य खातो, कबूतर २५ ग्रॅम धान्य खाते आणि चिमणी ८ ग्रॅमवर निर्वाह करते. तथापि अन्नधान्याचा सर्वांत अधिक फडशा उंदीर पाडतात. एक उंदीर रोज ५० ग्रॅम धान्य गिळंकृत करतो.

**संततिनियमनाच्या गोळया धोक्याच्या?**—संततिनियमनाच्या साधनांपैकी तोंडाने घ्यावयाच्या गोळया धोक्याच्या असल्याचे अमेरिकेच्या संबंधित खात्याने डॉक्टर्सना कळविले आहे. ह्या गोळयांच्या सेवनाने डोळयांवर परिणाम होतो आणि नसा आखडण्याचा संभव असतो असे नेत्रवैद्यांना आढळून आले आहे. ह्यासंबंधी अजून तपासणी चालू आहे. परंतु धोका खरा ठरल्यास संततिनियमनाचा प्रचार करण्याच्या मार्गातील ती एक मोठीच धोंड ठरेल.

**चिलखती पत्र्यांची निर्मिती**—रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यात सपाट पोलादी पत्रा तयार करण्यात येतो. ह्या कारखान्याने आता लष्करातील चिलखती वाहनांना लागणारा पोलादाचा पत्रा तयार करण्यास आरंभ केला आहे. आवडी येथील रणगाड्यांच्या कारखान्याला लागणारा पोलादी पत्रा येथे तयार करण्यात येण्याची शक्यता आहे. विमानांना लागणारे पोलादी पत्रेही कारखान्यात तयार करण्यात येण्याचा संभव आहे.

**एअर इंडिआ विमानात झेक हवाई सुंदरी**—एअर इंडिया विमानामधून प्राग ते न्यूयॉर्क प्रवास करणाऱ्यांची संख्या अलीकडे बरीच वाढली आहे. पण ह्या मार्गावरील विमानांतून जाणाऱ्या बहुतेक प्रवाशांना फक्त झेक भाषाच अवगत असते. त्यामुळे विमानातील हवाई सुंदरींना त्यांची बडदास्त नीट ठेवता येत नाही. आता ह्या व इतर काही मार्गांवर झेक हवाई सुंदरींना कामावर घेण्यात येणार आहे.

**बँकांवरील निर्बंध सैल केले**—पंजाबमधील शेड्यूल्ड बँकांवर धान्याच्या तारणावर कर्जे देण्यासंबंधी जे निर्बंध होते ते सैल करण्याचा निर्णय घेतला आहे. भारत-पाकिस्तान संघर्षाच्या कारणाने पंजाबमधील उद्योगधंद्यांत व व्यापारात बराच विस्कळीतपणा आलेला आहे. तो दूर करून व्यवहार पुन्हा सुसूत्र चालण्यास मदत करण्यासाठी हे धोरण स्वीकारण्यात आले आहे.


## "पैशाचे" काही प्राचीन प्रकार......

आज देवघेवीचं चलन पैसा आहे हे काही सांगायला नको. कदाचित अगदी प्राचीन पहिले चलन म्हणजे "बैल". शिंपले, कवडया, सोने, चांदी, लोखंड, निकल इत्यादी धातूसुद्धा चलन म्हणून रोजच्या व्यवहारात वापरली जात. आज त्याची जागा रोख नाणी–नोटांनी घेतली असून लहान मोठे व्यवहार बँका करतात. आपले आर्थिक व्यवहार सोईसवलतीने करण्यात बेळगांव बँक नेहमीच पुढे राहण्याच्या प्रयत्नांत असते. त्यासाठी आमच्या म्हैसूर व महाराष्ट्र आणि गोवा राज्यात ३८ शाखा आहेत. त्या आपल्याच सेवेकरितां आहेत हे ध्यानात असू द्या.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

शेड्यूल्ड बँक * * * * * * * * * * * * * स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगाव

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९

३

# अर्थ

बुधवार, १ डिसेंबर, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अन्नधान्यविषयक परिस्थिती दहा वर्षे बिकट

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेची द्विवार्षिक परिषद रोम येथे भरली होती. जगांतील उपासमार थांबविण्याच्या प्रयत्नांचा विचार करण्यासाठी भरविण्यात येत असलेल्या ह्या परिषदेला १०९ देशांचे प्रतिनिधी हजर होते. कांही देशांचे तर खुद्द अन्नमंत्रीच हजर होते. परिषदेत भाषण करताना संघटनेचे सरचालक श्री. बी. आर सेन म्हणाले की जगातील अन्नधान्याचा प्रश्न चिंताजनक आहे. दाट लोकवस्ती असलेल्या काही भूभागांतून येत्या पाच ते दहा वर्षांत गंभीर स्वरूपाचा दुष्काळ पडण्याचा संभव दिसत आहे. गेल्या ७ वर्षांच्या अवधीत जगात दरडोई अन्नधान्याच्या उत्पादनात विशेष वाढ झालेली नाही. दक्षिण अमेरिका आणि अतिपूर्वेकडील देशामधून तर दरडोई उत्पादनात २५ वर्षांपूर्वीच्या मानाने घटच झालेली दिसून येते. शेतीच्या शास्त्रीय तंत्राप्रमाणे भविष्यकालात समृद्धी निर्माण करता येणे शक्य आहे, पण खरा प्रश्न वेगळाच आहे. अविकसित देशांतील उत्पादन इतक्या झपाट्याने वाढले पाहिजे की त्यामुळे येत्या २० वर्षांची गरज भागविता आली पाहिजे. तसे होईल काय, हा खरा मुद्याचा प्रश्न आहे. तो सोडविण्यासाठी विकसनशील देशांनी अमाप कष्ट करणे आवश्यक आहे. विचार अगर कृति ह्याबाबत मरगळून जाण्याची ही वेळ नाही. आजच्या जगात सरहद्दी शिल्लक राहिलेल्या नाहीत. जगाच्या एका भागातील माणसे भूक आणि मृत्यू ह्यांच्या भक्ष्यस्थानी पडत असता दुसऱ्या भागातील लोकांवर त्याचा मोठा परिणाम होणारच. अविकसित देशांतील अन्नधान्याचे उत्पादन वाढण्यात अनेक अडचणी आहेत. उत्पादनासाठी प्रेरणेचा अभाव, शेतीमालाच्या अस्थिर किंमती, शेतीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जावरील जबर व्याज, जमीनधारणेबाबत अनिश्चिती, निरक्षरता आणि प्रशिक्षण घेतलेल्या नौकर वर्गाचा अभाव, ह्या अडचणी प्रमुख आहेत.

## दारिद्र्यनाशासाठी बचत करण्याची आवश्यकता

सुरत आणि बलसाड जिल्ह्यांतील भूमिहीन मजुरांच्या मेळाव्यात भाषण करताना नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता ह्यांनी महत्त्वाचे आर्थिक विचार व्यक्त केले आहेत. ह्या मेळाव्याला ५ हजार भूमिहीन मजूर आलेले होते. श्री. मेहता आपल्या भाषणात म्हणाले की लोकांनी अधिकाधिक बचत करण्याच्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत. हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत दारिद्र्याचा नाश करणे कधीही शक्य होणार नाही. अलीकडे प्रत्येकजण आपले वैयक्तिक उत्पन्न वाढवून संपन्न जीवन जगण्याचे प्रयत्न करण्यात गर्क झालेला दिसतो. परंतु अशा प्रयत्नांमुळे देशाची भरभराट होणार नाही. देशाची भरभराट करून आणण्याचा एकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे शेतीच्या व उद्योगधंद्यांच्या उत्पादनात वाढ करणे. उत्पादनाच्या ह्या दोन्ही क्षेत्रांत वाढ झाली तर व्यक्तीच्या राहणीच्या दर्जात आपोआपच सुधारणा होईल. शहरातून मोठमोठ्या भव्य इमारती बांधता कामा नयेत. अशा इमारती बांधण्याची वेळ अद्याप आलेली नाही. भारतापुढे असलेल्या अनेक तातडीच्या गरजांत घर बांधण्याची गरज अतिशय निकडीची आहे. पण ह्या कामातही आधी काय व मग काय ह्याचा विचार करावा लागतो. रशिआत १९१७ साली राज्यक्रांति झाल्यावर १५ वर्षांचा नियोजनाच्या कार्यक्रमात घर बांधणीला स्थानच देण्यात आले नाही. राहती घरे महत्त्वाची आहेत पण त्यांना अत्युच्च अग्रहक्क देता येणार नाही. त्यापेक्षा शिक्षण ही अधिक महत्त्वाची बाब आहे. भूमिहीन मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाला अधिक महत्त्व देण्यात आले पाहिजे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिक तंत्राची माहिती करून देण्यात आली पाहिजे. ह्या तंत्राचा उपयोग करून घेण्यासारखी परिस्थितीही त्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे.

## संरक्षणविषयक उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

संरक्षणविषयक उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे महत्त्व भारत-पाकिस्तान संघर्ष झाल्यासून विशेष स्पष्टपणे दिसून आले. पण, हे उत्पादन वाढविण्यासाठी यांत्रिक हत्यारांची मोठ्या प्रमाणात गरज लागेल. संरक्षणविषयक गरजा लक्षात घेऊन यांत्रिक हत्यारे तयार करणाऱ्या कारखान्यांनी आपल्या उत्पादनाच्या कार्यक्रमात बदल करण्याचे ठरविले आहे. ह्या कारखान्यांनी संरक्षणविषयक उत्पादनाला अग्रहक्क दिला असून आपल्याजवळील उत्पादनाच्या सोयीसवलती संरक्षण खात्याला देऊ केल्या आहेत. संरक्षणविषयक एंजिनिअरिंगच्या बाबतीत आयात केलेल्या साधनांची गरज लागणार नाही अशा पद्धतीने कारखान्यांची पुनर्घटना करण्यात येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात यांत्रिक हत्यारांच्या कारखान्यांनी चांगली प्रगती केली असून चालू वर्षात ते २५ कोटी रुपयांचा माल तयार करतील अशी अपेक्षा आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात त्यांचे उत्पादन चौपटीने वाढण्याची शक्यता आहे. ह्या धंद्यातील सार्वजनिक मालकीच्या विभागातील कारखाने बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या संघटनेच्या अखत्यारात आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ह्या विभागातील कारखाने ४० कोटी रुपये किंमतीची हत्यारे तयार करतील असा अंदाज आहे. खाजगी मालकीच्या विभागात यांत्रिक हत्यारांचे ८० कारखाने असून ते १४ कोटी रुपयांचा माल निर्माण करू शकतील. ह्याशिवाय झेकोस्लोव्हाकिआच्या मदतीने आणखी दोन नवीन कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागात काढण्यात येणार आहेत. त्यापैकी एक अजमीर येथे आणि दुसरा भावनगर येथे उभारला जाईल. ह्या कारखान्यासंबंधीचे अहवाल येत्या सहा महिन्यांच्या अवधीत हाती येतील.

## स्त्री-डॉक्टरांचा तुटवडा

संततिनियमनाच्या साधनांचा प्रसार करण्याच्या कामी गुजरात व बंगालच्या मानाने महाराष्ट्र मागे पडत चालला आहे. कारण, महाराष्ट्रात स्त्री-डॉक्टरांचा फारच तुटवडा आहे. त्यामुळे लूपसारख्या साधनांचा प्रसार करण्याचे काम महाराष्ट्रात पुरुष डॉक्टरांना करावे लागते. पण, स्त्रिया पुरुष-डॉक्टरांना बुजतात, असा अनुभव येत आहे.

## श्री. वैकुंठराय मेहता

### श्री. खंडागळे ह्यांनी मनःचक्षूंपुढे उभे केलेले वास्तव चित्र

*[श्री. कृ. ह. ढमढेरे हे मुंबई येथील परफ्युमरीचे सुप्रसिद्ध व्यापारी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष आणि त्या चेंबरचे पुणे विद्यापीठाच्या कोर्टावरील प्रतिनिधी आहेत. अशा सुविद्य, मान्यवर वाचकाने व्यक्त केलेल्या आपल्या प्रतिक्रियेला विशेष महत्त्व आहे.]*

सादर नमस्कार वि. वि. आपल्या "अर्थ" पाक्षिकाच्या १७ नोव्हेंबर १९६५ च्या अंकांत "वैकुंठराय मेहता" या शीर्षकाखाली आलेला सर्वांगसुंदर व सुबोध लेख वाचून फार संतोष झाला.

खरोखरीच एक आदर्श मानण्याइतका तो लेख सुंदर विवेचनात्मक असून मुद्देसूद व वास्तवचित्र मनःचक्षूंपुढे उभे करणारा असा आहे. लेखाची भाषा प्रौढ असूनही सहज, वाणी साधी, या स्वरूपाची पाहून संतोष वाटला. वैकुंठराय यांच्या आयुःक्रमाची सर्वांगपरिपूर्ण माहिती, सुयोग्य शब्दांत मांडली गेली असून, "अर्थ" पाक्षिकाची 'पाल्हाळ विरहित' विविधलक्षी पद्धत, त्या लेखकाने उत्तम अंगिकारिली आहे, असे दिसून आले. वैकुंठराय यांचे इतके समर्पक माहितीपूर्ण वर्णन, इतक्या मर्यादित शब्दांत, केव्हाच वाचण्यास मिळाले नव्हते. खरोखरी न्यायमूर्ती रानडे यांचा मृत्युलेख लोकमान्य टिळकांनी लिहिला होता, किंवा लो. टिळक यांच्याबद्दल तात्यासाहेब केळकर यांनी लेख लिहिला, त्या तोलामोलाचा किंवा त्या पठडीतील असा हा लेख वाटला.

थोडक्यात म्हणावयाचे, तर निबंधलेखन कसे असावे याचे धडे देणाऱ्या महाविद्यालयांतील उच्चक्रमाच्या पाठ्यपुस्तकात हा लेख चांगलाच शोभून दिसावा, अशा उच्च साहित्यमूल्याचाच आहे असे वाटते.

शक्य असल्यास त्या लेखकास माझे हे विचार सारांशाने कळवून समस्त वाचकांतर्फेच म्हणाना, मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करीत असल्याचे बारामतीस लिहावे. आपण असा निवडक व उच्च साहित्यशोभक लेख वाचकांकरिता मिळवून प्रसिद्धिला म्हणून आपणासहि धन्यवाद देतो. कळावे, लोभ असावा हे वि.

४७–४८, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २

आपला नम्र,
कृ. ह. ढमढेरे

---

### आक्रमक रणसाहित्याच्या उत्पादनातील पहिले पाऊल

भारतात आता लवकरच रणगाडे तयार होऊ लागतील. आतापर्यंत भारताने संरक्षक शस्त्रांच्या उत्पादनावरच मुख्य भर दिलेला होता. पण गेल्या दोन–तीन वर्षांतील अनुभवावरून आता आक्रमक शस्त्रे तयार करण्यात येऊ लागली आहेत. शस्त्रांत मुख्यतः बॉंबफेकी विमाने, आक्रमक पाणबुड्या आणि रणगाडे ह्यांचा समावेश होतो. जगात रणगाडे निर्माण करणारी १४ राष्ट्रे आहेत. आता त्यात भारताची भर पडत आहे. ह्या प्रकारच्या रणसाहित्याच्या उत्पादनात भारत जपानच्या मागे ८ वर्षे आणि ब्रिटनच्या मागे ५० वर्षे आहे. चांगल्या बनावटीच्या व नमुन्याच्या एका रणगाड्याला ५ लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. एक चिलखती तुकडी तयार करण्यासाठी ४० ते ५० कोटी रुपये खर्च करावा लागतो. एक चिलखती तुकडी आघाडीवर एक दिवस लढवावयाची तर तिला १५० टन दारूगोळा आणि ३५० टन इंधन पुरवावे लागते.

### संरक्षण–सामग्रीचे खाजगी विभागातील उत्पादन

खाजगी विभागातील कारखान्यांनी संरक्षण सामग्रीचे उत्पादन करण्याच्या कामी लावलेल्या हातभाराची माहिती मध्यवर्ती सरकारचे पुरवठा व विकासमंत्री श्री. रघुरामय्या ह्यांनी सांगितली आहे. पत्रकार परिषदेत ह्याविषयी बोलताना ते म्हणाले की, संरक्षणविषयक सामग्री निर्माण करण्याच्या कामी खाजगी मालकीच्या कारखान्यांनी लक्षात भरण्यासारखी कामगिरी केली आहे. ऑक्टोबर १९६२ पासून १२० खाजगी कारखान्यांकडे शस्त्रास्त्रांच्या व त्यांना लागणाऱ्या सुट्या भागांच्या मागण्या नोंदण्यात येऊ लागल्या. ह्या सर्व मागण्यात १५·७ कोटी रुपयांच्या मालाचा पुरवठा हवा होता. कारखान्यांनी आतापर्यंत ५·५ कोटी रुपये किंमतीचा माल पुरविलेला आहे. कारखान्यांत आलेल्या अनुभवावरून असे दिसून आले की भारताजवळ तांत्रिक कुशलतेने काम करणारे कामगार आहेत. काही कारखान्यांकडून जो माल मागविण्यात आला होता तो पूर्वी आयात करावा लागत असे. कारण, त्या मालाच्या उत्पादनात बरीच गुंतागुंत असे. तरीसुद्धा अशा प्रकारच्या महत्त्वाच्या मालाचे उत्पादन कारखान्यात होऊ शकले. संरक्षणविषयक उत्पादनाच्या कामी आयातीवर अवलंबून न राहण्याचे आणि शक्य तितका देशी कच्चा माल वापरण्याचे यत्न करण्यात येत आहेत. उद्योगपतींनी ह्या बाबतीत देऊ केलेले सहकार्य उत्तेजक आहे.

---

### जपानच्या सहकार्याने नमुनेदार भातशेती

भातशेती जपानी पद्धतीने करून तांदुळाचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न भारतात करण्यात येत आहेत. १९६२ साली जपानी पद्धतीची ४ नमुनेदार शेते भारतात स्थापन करण्यात आली. ह्या शेतातील भाताचे उत्पादन तिपटीने वाढल्याचे आढळून आले आहे. आता मद्रास राज्यात आणखी एक जपानी भातशेती केंद्र स्थापन करण्यात आले आहे. जपानमधील १७ टक्के जमीनच लागवडीखाली आणण्यासारखी आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या १० वर्षांत जपानच्या एकूण आयातीपैकी एकचतुर्थांश किंमतीचा माल अन्नधान्याचा होता. त्यानंतर जपानने जमीनधारणेच्या कायद्यात सुधारणा केली आणि शेतीच्या आधुनिक पद्धती अंमलात आणल्या. त्यामुळे जपान आता अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला आहे. मद्रास राज्यात स्थापन झालेले भातशेती केंद्र अशा प्रकारचे आठवे केंद्र आहे.

---

### पेट्रोलच्या धंद्यास जपानची मदत

भारताचा दौरा करून गेलेल्या जपानी तंत्रज्ञांनी भारताच्या खनिज तेलाच्या व कापडाच्या धंद्यास जपानची मदत मिळण्याची शक्यता ध्वनित केली आहे. पेट्रोलच्या धंद्यातील जपानचे ज्ञान अद्ययावत असून ह्या धंद्याचा कारभार चालविण्याचा अनुभवही त्याला चांगला आहे. भारतामधील रासायनिक पदार्थांचे उत्पादन स्वस्त किंमतीत झाले पाहिजे अशी सूचना जपानच्या तंत्रज्ञांनी केली आहे.

---

### हृदयाचे काम करणारा पंप

आणखी थोड्या वर्षांच्या आतच शस्त्रक्रियेच्या प्रसंगी जरूर पडल्यास हृदयाचे काम करणारा एक कृत्रिम पंप माणसाच्या शरीरात बसविणे शक्य होईल, असे मत कॅनडातील एका प्रसिद्ध शस्त्र-वैद्याने व्यक्त केले आहे. अशा प्रकारची उपकरणे तयार करण्याचे काम यांत्रिक रचनेचे असल्यामुळे पंप तयार करण्याचे काम करणे फारसे अवघड नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# श्री संत दामाजी महाराज

## भीषण दुष्काळात जनतेला अपरंपार मदत करणारा इतिहासप्रसिद्ध पुरुष

महाराष्ट्रांचा इतिहास जसा शूरांच्या पराक्रमाने भरला आहे, तशीच संतांची वाणीही त्यात आहे. अशा थोर संतमालिकेत मंगळवेढ्याच्या दामाजीपंतांची गणना होते.

दामाजीपंतांचा काळ म्हणजे बहामनी राज्यातला १३४७ मध्ये हसन गंगू बहामनीने बहामनी राज्य गुलबर्गा येथे स्थापले. १४२९ मध्ये अहमदशहाने बिदरला राजधानी आणली. १४२२ ते १४३५ पर्यंत राज्य केले. सर्व बहामनी राजांत हा बादशहा चांगला होता. त्याच्याच पदरी दामाजीपंतांची नेमणूक झालेली. जागा कारकुनाची असली तरी दामाजींचे कर्तृत्व राजाला लाजवील असे होते. पंचवीस वर्षांच्या दामाजींना रोज तख्त महालात बसून दप्तर सांभाळावे लागे. त्यांचा चेहरा तरतरीत होता. श्रद्धावान होता. कपाळावर गंध असलेल्या दामाजींची कुणावरही चटकन मोहिनी पडे. ते दिसायला रुबाबदार व घोड्यावर बसण्यात वाकबगार होते. त्यांचे मोडी अक्षर मोत्यासारखे वळणदार होते. आपल्या कामात ते सदैव गढून गेलेले असत. खुद्द बादशाहा सुद्धा त्यांच्या कामावर खुष असत.

नंतरची दामाजींनी स्वीकारलेली जबाबदारी म्हणजे मंगळवेढ्यासारख्या ठिकाणी तहशीलदार म्हणून काम करण्यास सुरवात. दामाजींची ख्याती ज्याविषयी आहे ती म्हणजे मंगळवेढ्यास पडलेल्या भीषण दुष्काळात जनतेला दिलेली अपरंपार मदत.

१४५८ सालचे भीषण दृश्य म्हणजे पावसाचा अभाव. आसपासचा सगळा प्रदेश दुष्काळाच्या खाईत लोटलेला. पंढरपूर, सोलापूर, सांगोला, विजापूर, सगळ्या प्रदेशातील लोक भुकेने मरत होते. जुन्या काळातली गोष्ट असल्याने इतर ठिकाणांहून धान्य आणून देण्याचीही मारामार होती. विहिरी-तळी आटलेली, गुरांना चारापाणी नाही. प्राणापेक्षा प्रिय गुरे तडफडून मरायला लागलेली. शेतकऱ्याचा परिस्थिती हवालदील. अशात प्रत्येकाला आधार वाटत होता, तो दामाजींचा. कारण सर्वत्र दुष्काळाची छाया होती, तरी दामाजींचे गावात अन्नछत्र होते. त्यांची साध्वी पत्नी सावित्रीबाई येईल त्याला पोटभर जेवायला घालीत होती. ही वार्ता हा हा म्हणता वाऱ्यासारखी पसरत होती. भुकेल्या गोरगरीबांच्या रांगा मंगळवेढ्याच्या दिशेने वाढत होत्या. अन्नछत्राचे स्वरूप सहस्रभोजनात झाले परंतु दामाजीपंत आणि त्यांच्या पत्नीला काळजी नव्हती. अन्नाला अन्न देऊन त्यांच्यातला भगवान ती दोघे जागवत होती. भरमसाट वेगाने येणाऱ्यांची गर्दी वाढत होती, आणि एक दिवस दामाजींच्या घरातली कोठीच संपुष्टात आली.

डोळ्यांपुढे दिसत होती भूकबळी झालेली जनता आणि बादशहाच्या कोठारात तर कणगींच्या कणगी शिल्लक राहिलेल्या. पण धान्याची कोठारे बादशहाच्या परवानगीवाचून उपयोगात कशी आणायची? बादशहाला हजार निरोप जाऊनही उत्तर नाही. शेवटी दामाजींनी सर्व कोठारांची कुलुपे काढली. भुकेल्या जनतेचा आनंद गगनात मावत नव्हता. जाईल तेवढे धान्य लोक नेऊ लागले. भुकेल्यांना अन्नदाता भेटला, पण ही बातमी बादशाहाला कळताच चार सांडणीस्वार दामाजींना पकडून आयला दत्त. डोळ्यातल्या पाण्यानिशी दामाजींनी घरचा निरोप घेतला. वाटेत पंढरपुरला पांडुरंगाचे दर्शन करून पुढे जायचे. लोकांना वाटत होते, कडक शिस्तीचा बादशहा दामाजींना तोफेच्या तोंडी देणार. पण पंढरपुरातच विठ्ठलाच्या आराधनेत असताना बादशहाच्या सहीची "तुम्ही दुष्काळग्रस्तांना जे धान्य दिले त्याच्या एक लक्ष, वीस हजार मोहरा विठू महार याचेबरोबर पाठविल्या त्या पोचल्या. तुमचे प्रामाणिकपणाबद्दल व दक्ष कारभाराबद्दल तुम्हास धन्यवाद" अशी रशीद मिळाली. दामाजींच्या डोळ्यातल्या पाण्याचा वेग वाढत होता.

काळ बदलला. दामाजींची कथा इतिहास व पुराणात गेल्यासारखी वाटली तरी तिच्यातली भावना अजूनही काळजाला भिडणारी आहे. प्रत्येकाने ही दामाजींची वृत्ती बाणवायला हवी. असेल ते धान्य एकट्याने न खाता चारचौघांना देण्यातच खरा आनंद आहे.

मेजवान्या टाळणे आणि दर आठवड्यास सोमवारी एक वेळ न जेवणे, एवढे तरी प्रत्येकाला शक्य आहे.

## दुर्गादेवी

### ३०० वर्षांपूर्वीच्या भीषण दुष्काळाची आठवण

इ. स. १६४८ मध्ये महाराष्ट्रात जो सात वर्षांचा मोठा दुष्काळ पडला होता, त्याला "दुर्गादेवी" असे म्हणत असत. सात वर्षांनंतर, १६५५ पासून पुन: पाऊस वेळच्या वेळी पडू लागला. परंतु या दुष्काळात सर्व देश उजाड झाला, गोदावरी व कृष्णा ह्यांच्या दरम्यानच्या प्रदेशाला त्याचे परिणाम पुढे ३० वर्षे भोगावे लागले. या दुष्काळात मोंगलाईतील पुष्कळ घराणी वरघाटी आली, त्यांना दुर्गाडी म्हणत. सर्व देश उजाड झाल्यामुळे सरकारी वसूल थकला, पुणतांबे येथे असलेली प्राचीन संस्कृत विद्यापीठे बंद पडली, त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक पंडित घराणी काशीस गेली. वतने बंद पडल्यामुळे जुनी देवस्थाने लयास गेली. हल्लीच्या महाराष्ट्रातील पाटिलक्या, देशमुख्या, वगैरे अधिकार दुर्गाडीनंतरच्या आहेत, असे इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात.

## बँक ऑफ कराड लि. च्या कोल्हापूर शाखेचे उद्घाटन

कराडच्या दि बँक ऑफ कराड लि. या बँकेच्या कोल्हापूर शाखेचे उद्घाटन, शिवाजी चौकातील मणेर बिल्डिंगमध्ये दै. पुढारीचे संपादक श्रीमान् गणपतराव जाधव यांच्या मंगलहस्ते सोमवार सकाळी १० वाजता झाले. या प्रसंगी केलेल्या छोट्याशा भाषणात श्री. जाधव म्हणाले:—

"बँक ऑफ कराडची शाखा आज कोल्हापूर येथे सुरू होत आहे या बँकेला संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचा आशीर्वाद लाभलेला आहे. या निमित्ताने आज कराड व कोल्हापुरचा संगमच होत आहे. कोल्हापुरच्या नागरिकांची सेवा करण्याबरोबर कोल्हापुरच्या औद्योगिक विकासालाही ही बँक हातभार लावील, अशी मला आशा आहे."

### रा. गोपाळराव श्रीखंडे यांचा गौरव

आपल्या भाषणात श्री. जाधव यांनी शाखाधिकारी श्री. गोपाळराव श्रीखंडे याचा 'कोल्हापूरमधील बँकिंग धंद्यातील एक तज्ज्ञ' असा यथोचित गौरव केला. ते म्हणाले, "गेली अनेक वर्षे श्री. गोपाळराव कोल्हापुरच्या बँक व्यवसायात मार्गदर्शकाची भूमिका पार पाडीत आहेत. एकवेळ अशी होती की, कोल्हापुरातील धनवान लोक पैसा स्वतःच्या घरातच ठेवीत. श्री. गोपाळराव यांनी त्या सर्वांना बँकिंगची सवय लावली, इतकेच नव्हे तर अनेक व्यक्तींच्या उद्योगधंद्यांच्या विकासाला व आर्थिक प्रगतीला त्यांचे मार्गदर्शन व साहाय्याचा लाभ झालेला आहे."

शेवटी येथील एक प्रमुख उद्योगपती व बँकेचे संचालक श्री. एस्. एम्. घाडगे यांनी पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानले.

## आपली कामे आपणच करण्याची मोहीम

जुन्या पिढीतील म्हणजे आता वयाची साठी ओलांडलेली अनेक माणसे स्वतःची कामे स्वतःच करताना अजूनही कोठे कोठे दिसतात. पण त्यांच्या तारुण्यांतील असली कामे म्हणजे बहुधा घरातीलच असत. आताच्या तांत्रिक युगातील कामे त्यांनाच काय पण पुष्कळशा तरुणांनाही करता-येत नाहीत. भारत आता तंत्र युगात प्रवेश करीत असल्याने ही उणीव भरून काढणे आवश्यक आहे. ब्रिटनसारख्या तांत्रिकदृष्ट्या पुढारलेल्या देशात सुद्धा नौकरांच्या अभावी अनेक कामे घरच्या माणसांनीच करण्याची पद्धत फोफावत चालली आहे. स्वयंपाकघरांत लागणारे टेबल करणे, घराला रंग देणे, बागकाम करणे, अशी अनेक कामे ब्रिटिश नागरिक स्वतःच करू लागले आहेत. कारण, कामगार वेळेवर मिळत नाहीत आणि त्यांची मजुरीही परवडत नाही. ब्रिटनमधील प्रचंड विविध भांडारांतून घरांतील कामे करण्यासाठी लागणारी अवजारे तर मिळतातच; पण कामाबद्दल तपशीलवार सूचना देणाऱ्या सूचनापत्रिकाही मिळतात. घरची कामे स्वतःच कशी करता येतील ह्या संबंधीचे एक प्रदर्शन नुकतेच लंडन येथे भरविण्यात आले होते. त्यात अनेक प्रकारच्या कामांबाबत मार्ग-दर्शन करणारी २०० दालने होती. अशी कामे पुष्कळदा छंद म्हणून करता करता काही लोकांना तर त्यांतूनच द्रव्यार्जनाचा मार्गही दिसू लागल्याची उदाहरणे आहेत. 'तुमचे तुम्हीच करा' ह्या अर्थाच्या शीर्षकाचे एक मासिकच ब्रिटनमध्ये निघत असून त्याचा खास असा वाचकवर्गही तयार झाला आहे. ब्रिटनमध्ये स्वावलंबनाची ही चळवळ इतकी प्रसृत झाली आहे, की त्या चळवळीच्या कामाची किंमत ४ कोटी पौंडांपर्यंत आली आहे.

## पश्चिम युरोपच्या ऱ्हासाला अमेरिका जबाबदार

वेस्टर्न युरोपिअन युनिअन ह्या संघटनेसमोर भाषण करताना ब्रिटनच्या हुजूर पक्षातील एक माजी मंत्री मि. डंकन सँडस ह्यांनी अमेरिकेवर कडाडून हल्ला चढविला. ते म्हणाले की अमेरिका हे एक वसाहतवादी राष्ट्र असून त्याने पश्चिम युरोपातील देशांची निर्दयपणे पिळवणूक चालविलेली आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे की, शास्त्रीय ज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगात आणि तंत्रज्ञानात पश्चिम युरोप झपाट्याने अमेरिकेच्या मागे पडत चालला आहे. आधुनिक उद्योगधंद्यांच्या काही क्षेत्रांत तर अमेरिकेने जवळजवळ मक्तेदारीच स्थापन केलेली आहे. तांत्रिक ज्ञानाच्या व त्याच्या वापराच्या दृष्टीने युरोप हा मागासलेला विभाग बनण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. आशिया आणि आफ्रिका ह्या मागासलेल्या खंडांत ज्याप्रमाणे अमेरिका आपल्या मालकीचे कारखाने काढून स्थानिक बाजारपेठेचा फायदा घेते त्याचप्रमाणे ती युरोपातही करते. भविष्यकाळची बात सोडाच, पण आजच युरोपातील अनेक प्रसिद्ध कंपन्या मोठमोठ्या अमेरिकन कंपन्यांच्या उपकंपन्या झाल्या आहेत. संरक्षणासाठी लागणाऱ्या अनेक साधनांच्या बाबतींतसुद्धा युरोप सध्या अमेरिकेवर अवलंबून आहे. अटलांटिक महासागरापलीकडून येणाऱ्या ह्या आव्हानाला तोंड देण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे पश्चिम युरोपने आपली अंतर्गत बाजारपेठ विस्तृत करणे आणि समर्थ करणे. अमेरिका ही उत्तर अटलांटिक करार संघटनेतील प्रमुख शक्ती आहे. ह्या लष्करी करारांतील देशांसाठी लागणारी स्वनातीत विमाने, प्रेरित क्षेपणास्त्रे, इलेक्ट्रॉनिक साधने, यांत्रिक गणित यंत्रे, इत्यादी माल अमेरिकेत तयार होतो. हा संरक्षणविषयक माल अमेरिकेतच तयार व्हावा म्हणून अमेरिका नाना तऱ्हेच्या सबबी पुढे आणील. पश्चिम युरोपातील देशांनी ह्या बाबतीत अमेरिकेला खंबीर विरोध केला पाहिजे.


दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा-शहर

*दि. १८-७-६५ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरात खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते:—दि. १-२-६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई
टेलिफोन नं. २५५४७४-७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी :

महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | ५,३०,५१,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,५६,७५,००० |
| ठेवी | ... | ३९,१४ ३१,००० |
| खेळते भांडवल | ... | ९१,४८,३५,००० |

भारतातील प्रमुख शहरी हुंड्या, बिले वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

## राष्ट्रीय संरक्षणनिधीस भिवंडी नागरिक सहकारी बँकेची मोलाची भर

### २०,००१ रु. ची देणगी

भिवंडी येथील नागरिक सहकारी बँक लि. ची वार्षिक सभा रविवार दिनांक १४–११–६५ रोजी झाली. त्या वेळीं बँकेच्या संचालक मंडळाने सुचविलेली सभासदांना या वर्षी मिळावयाची डिव्हिडंडची सर्वच्यासर्व रक्कम रु. १८,००० सभासदांना डिव्हिडंड म्हणून मंजूर न करता, त्यामध्ये इतर फंडातील रु. २,००१ ची भर घालून एकूण रु. २०,००१ परस्पर राष्ट्रीय संरक्षण निधीस द्यावेत, असा ठराव मंजूर केला.

आमच्या माहितीप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील नागरिक सहकारी संस्थांमध्ये सर्व बाबतींत प्रगतिशील असलेल्या या बँकेने केवळ दोन लाख रुपये शेअर भांडवलावर व्यवहार करीत असताना रु. २ ,००१ राष्ट्रीय संरक्षण निधीस देऊन या बाबतीत जिल्ह्यामध्ये उच्चांक प्रस्थापित केला आहे व इतर सहकारी संस्थांसमोर एक नवा आदर्शही ठेवला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही बँक " अ " वर्गात आहे.

युद्धजन्य परिस्थीतिमुळे भिवंडी येथील यंत्रमाग धंद्यावर संकट कोसळले असताही, सभासदांनी आपली राष्ट्रीय जबाबदारी उमजून या वर्षी डिव्हिडंड म्हणून मंजूर न करता संपूर्ण रक्कम राष्ट्रीय संरक्षण निधीस दिली, याबद्दल इकडील भागातील जनता या बँकेचे व सभासदांचे कौतुक व अभिनंदन करीत आहे.


---

## रूरकेला कारखान्यात तयार झालेले पोलादाचे नळ

जर्मनीच्या साह्याने उभारण्यात आलेल्या रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यात तयार करण्यात येणारे पोलादी नळ परदेशातून आयात करण्यात आलेल्या नळापेक्षाही चांगले असल्याचे सिद्ध झाले आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने क़ानपूर–हाल्दिआ–बरौनी ह्या शहरांना जोडणारे तेल वाहतुकीचे १५ हजार टन वजनाचे नळ वापरले आहेत. हे नळ रूरकेला येथील कारखान्यातच तयार करण्यात आले होते. हे नळ गळण्याचे अगर फुटण्याचे प्रमाण अल्प आहे. ह्याच कामासाठी परदेशीय बनावटीचे ४५ हजार टन वजनाचे नळ वापरण्यात आलेले आहेत. परंतु तुलनेने पाहता ह्या नळांचे गळण्याचे अगर फुटण्याचे प्रमाण अधिक आहे. रूरकेला येथील नळ तयार करण्याचा कारखाना हा भारतामधील सर्वांत मोठा आहे. कारखान्यातील उत्पादन जसजसे वाढत आहे तसतशी नळ निर्यात करण्याची शक्यताही वाढत आहे. कारखान्यात तयार झालेले २७ हजार टन वजनाचे नळ लवकरच इराकला निर्यात करण्यात येणार आहेत. निर्यातीमुळे भारताला ३ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होईल. रूरकेला येथे तयार करण्यात आलेले नळ ऑस्ट्रेलिआला निर्यात करण्यासंबंधी सध्या वाटाघाटी चालू आहेत. ह्या कारखान्यात काही विशिष्ट प्रकारचे मिश्र पोलाद लवकरच निर्माण करण्यात येऊ लागेल. त्याशिवाय न डागाळणारे पोलादही निर्माण करण्यात येऊ लागेल. निष्कलंक पोलादाचे उत्पादन सुरू झाल्यावर भारताचा २ कोटी रुपयांचा परदेशीय चलनातील खर्च दरसाल वाचेल. भारतात भारी उद्योगधंद्याचा पाया घालण्याचे धोरण स्वीकारण्यात आलेले असून त्यांत पोलादाच्या कारखान्यांना साहजिकच महत्त्वाचे स्थान आहे. सार्वजनिक मालकीच्या अशा कारखान्यातील उत्पादन जितके विविध प्रकारचे होईल तितके इष्टच आहे.




ठाकरसी फॅब्रिक्स
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड SANFORIZED
सूटिंग, शर्टिंग, सुंदर, साधे आणि
डिझाइन्सचे, तऱ्हेतऱ्हेचे कापड असे हे आवडते पुरुषांचे
THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रुप ऑफ मिल्स •धी क्राउन स्पिनिंग अँन्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •धी हिंदुस्तान स्पिनिंग अँन्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## स्त्रीकामगारांच्या विवाहाला आडकाठी आणणारा नियम बेकायदा

### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

आपल्या एका विशिष्ट खात्यातील ( पॅकिंग, लेबलिंग व इतर कामाचे खाते ) अविवाहित स्त्रियांवर, त्यांचा विवाह होताक्षणीच कामावरून दूर होण्याची सक्ती करण्याचा मुंबईमधील एका औषधी कंपनीचा नियम सुप्रीम कोर्टाने रद्द ठरविला आहे. ह्या नियमाचे कंपनीने केलेले समर्थन सुप्रीम कोर्टाला पटले नाही, म्हणून कोर्टाने सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हा निर्णय केला. इतर कंपन्यांतून असा नियम आहे, हे त्याचे समर्थन नव्हे.

इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलच्या निवाड्याविरुद्ध कामगारांच्या युनियनने केलेल्या अपिलाचा निवाडा करताना निकाल वाचून दाखविणारे न्यायमूर्ती वांछू, ह्यांनी संबंधित कंपनीने दिलेले 'एकमेव कारण' गैरलागू ठरविले. "संबंधित खात्यातील नोकरांना गटागटाने काम करावे लागते, त्यामुळे वक्तशीरपणा आवश्यक असतो आणि विवाहित स्त्रियांकडून वक्तशीरपणाची अपेक्षा करता येत नाही," हे ते कारण होते. विवाहित स्त्रियांत अविवाहित स्त्रियापेक्षा आणि विधवांपेक्षा गैरहजेरीचे प्रमाण अधिक आढळते; म्हणून विधवांना ही नोकरी खुली आहे, पण विवाहित स्त्रियांना नाही, असेही कंपनीने म्हटले होते.

न्यायमूर्तींच्या बेंचमध्ये न्यायमूर्ती वांछूंच्याबरोबर सरन्यायाधीश गजेंद्रगडकर, न्यायमूर्ती हिदायतुल्ला आणि न्यायमूर्ती रामस्वामी हेही होते. निवाड्याच्या तारखेपासून नियम रद्द झाल्याचे समजावे, असे बेंचाने ठरविले. उत्पादनाच्या इतर उद्योगधंद्यांतून हा नियम आढळत नाही आणि प्रस्तुत प्रकरणातील कंपनीच्या इतर खात्यांतही तो चालू नाही, मग पॅकिंगच्या खात्यालाच तो का लागू व्हावा? असे बेंचाने विचारले.

रजेवर जाणाऱ्या स्त्रियांची जागा घेण्यासाठी थोड्या जास्त स्त्रियांची नेमणूक करून त्यांच्या गैरहजेरीची अडचण सहज दूर करता येईल. अविवाहित स्त्रियांपेक्षा आणि विधवांपेक्षा विवाहित स्त्रियांची कार्यक्षमता कमी असते हे पटण्याजोगे नाही. कंपनीने इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस ( रिक्रूटमेंट ) रूलसचा दाखला दिला. परंतु ह्या नियमाप्रमाणे, अविवाहित स्त्रीवर विवाहानंतर नोकरी सोडण्याची सक्ती केलेली नाही. कंपनीने तशी केलेली आहे; कार्यक्षमतेचा विचारच केलेला नाही. आय. ए. एस. मधल्या स्त्री-अधिकाऱ्याच्या कार्यक्षमतेवर विवाहाचा प्रतिकूल परिणाम झाला आहे, असे मध्यवर्ती सरकारला वाटले, तरच ते सरकार तिच्याकडे राजीनाम्याची मागणी करू शकते.

---

### खाजगी कंपनी सरकारने घेतली

शिशाचे व जस्ताचे उत्पादन करणारी राजस्थानमधील एक खाजगी मालकीची कंपनी भारत सरकारने आपल्या ताब्यात घेतली आहे. ही कंपनी ताब्यात घेण्याचा प्रश्न बराच काळ सरकारच्या विचाराधीन होता. कंपनी उदयपूर मेटल्स कॉर्पोरेशनच्या मालकीची होती. कॉर्पोरेशनने सरकारकडून कर्ज घेतलेले होते. पण त्याच्या परतफेडीची जबाबदारी पाळता न आल्यामुळे सरकारला हा निर्णय घ्यावा लागला. सरकारने कॉर्पोरेशनला ३ कोटी रुपयाचे कर्ज दिले होते. कॉर्पोरेशनने आणखी ४ कोटी रुपयांच्या कर्जाची मागणी केल्यामुळे सरकारला दुसरा इलाजच नव्हता.

### मोठी शहरे म्हणजे देवीच्या रोगाची उत्पत्तिस्थाने

हिंदमधून देवीच्या रोगाचे उच्चाटन करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर मोहीम हाती घेण्यात आली असून त्या बाबतीत बऱ्याच प्रमाणात यशही आलेले आहे. पाश्चात्त्य देशांतून ह्या रोगाचे उच्चाटन होऊन कित्येक वर्षे झालेली आहेत. पण भारतात मात्र अनेक कारणांनी ह्या बाबतीत अजूनही प्रयत्न करावे लागतात. लोकसंख्येच्या वाढीबरोबरच शहरातून दाटीवाटीने राहणाऱ्या लोकांची संख्या फुगत चाललेली आहे. काही प्रमाणाबाहेर लोकसंख्या केंद्रित झाली की आरोग्याला अनेक प्रकारचे धोके साहजिकच उत्पन्न होत असतात. राहण्याच्या अपुऱ्या जागा, पाण्याचा अपुरा पुरवठा, इत्यादी कारणेही रोगाच्या साथी पसरण्याच्या कामी हातभार लावत असतात. भारतामधील मोठी शहरेही ह्या परिस्थितीला अपवाद नाहीत. दिल्ली, मद्रास, मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, अलाहाबाद, हैदराबाद, कानपूर, लखनौ, इत्यादी मोठ्या शहरांतून सार्वजनिक आरोग्य राखणे दिवसानुदिवस अधिक अवघड होत चालले आहे. देवीच्या रोगापुरते बोलावयाचे झाल्यास ह्या मोठ्या शहरांतून ह्या रोगाची उत्पत्ती नेहमीच होत असते असे आढळून आले आहे. ह्या दाट लोकवस्तीच्या शहरांत अगर त्याच्या परिसरात दर तीन-चार वर्षांनी देवीच्या साथीचा उद्भव होतो असा अनुभव आहे. शहरातील ही साथ आसपासच्या ग्रामीण भागात पसरण्याचा धोकाही असतोच. मोठ्या शहरातून अनेक लहान मुलांना देवी काढून घेण्यात येत नाहीत. १५ ते २९ वयाच्या लोकांना पुन्हा नियमितपणे देवी काढून घेणे आवश्यक असते पण हेही काम नीट होत नाही. देवीच्या रोगाची शंका आल्याबरोबर त्यावर उपाय करावे लागतात; उशिरा उपाय करून उपयोग होत नाही आणि किरकोळ प्रमाणात असलेल्या रोगाचे साथीत रूपांतर होते.

---

### राजस्थानमधील तांब्याच्या खाणींचा प्रकल्प

राजस्थानमधील खेत्रीनजीकच्या तांब्याच्या खाणीचा प्रकल्प पुरा करण्यासाठी भारत सरकारला फ्रान्सकडून १·८ कोटी डॉलर्सचे कर्ज मिळणार असल्याचे वृत्त आहे. उद्योगीकरण चालू असलेल्या कोणत्याही देशात तांब्याला फार महत्त्व प्राप्त होते. तांब्याच्या बाबतीत भारताला परदेशातील आयातीवर अवलंबून राहावे लागते. भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत संघर्ष सुरु झाल्यापासून काही देशांनी भारताचे औद्योगिक सामर्थ्य वाढविण्यासाठी लागणारा माल पाठविण्याचे बंद केले, अगर तो पुरविण्यासाठी प्रच्छन्नपणे राजकीय अटी घालण्यास प्रारंभ केला. संरक्षण साहित्याबाबत स्वयंपूर्ण होणे ही भारताची निकडीची गरज आहे. त्या दृष्टीने राजस्थानमधील तांब्याच्या खाणींचा विकास करणे अतिशय अगत्याचे आहे. राजस्थानमधील खाणीत बसविण्यात येणाऱ्या भट्टीची किंमत फ्रान्सने कळविली आहे. तथापि तिची किंमत फार वाटल्यास तीच घेण्याचे बंधन भारतावर नाही. भारताला इतर देशांकडून यंत्रसामग्री घेण्याची मुभा आहे. परंतु ती यंत्रसामग्री फ्रेंच आराखड्याशी जुळती असणारी असावयास पाहिजे हे उघडच आहे. खाणींचा विकास करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री उभारण्यास व नंतर तीवर देखरेख ठेवण्याचे काम करण्यास फ्रान्स तयार आहे. कोणत्या प्रकारची यंत्रसामग्री उपयुक्त ठरेल त्याची तपासणी करण्याचे काम राष्ट्रीय खाणी-विकास मंडळ करणार आहे. दरम्यान खाणीच्या जागी प्राथमिक कामास प्रारंभ करण्यात आला आहे. हे काम झपाट्याने करण्यासाठी अमेरिकेकडून काही यंत्रसामग्री यावयाची आहे. ती वाटेवर आहे.

### प्रगति अजमावण्याचे एक साधनः रेडीओ

आजच्या जगाच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने विभागणी करताना अनेक कसोट्या वापरल्या जातात. विजेच्या दरडोई खपाचीही एक कसोटी आहे. त्याच्याच अनुषंगाने एखाद्या देशातील रेडिओच्या संस्येची कसोटीही लावता येईल. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपसंघटनेने ह्याविषयी प्रसिद्ध केलेली माहिती उद्बोधक आहे. आज सर्व जगात मिळून ४० कोटी रेडिओ आहेत. प्रत्येक १०० माणसांमागे १३ रेडीओ असे हे प्रमाण पडते. एकूण संख्येच्या दृष्टीने विचार केला तर १० वर्षांपूर्वीच्या मानाने रेडिओच्या संख्येत ६० टक्के वाढ झालेली आहे. पण रेडिओची ही संख्या जगभर सारख्या प्रमाणात पसरलेली नाही. आफ्रिका आणि आशिया ह्या खंडांत प्रत्येक १०० माणसांमागे अवघे २ रेडिओ आहेत, युरोपमध्ये प्रत्येक १०० माणसांमागे २३ रेडिओ आहेत, रशिआत २१ आहेत आणि उत्तर अमेरिकेत ७२ आहेत. ह्यावरून त्या त्या भूभागातील कमी-अधिक प्रगत अवस्थांची कल्पना येते. सर्व जगात मिळून रेडिओवरून कार्यक्रम प्रक्षेपित करणारे १२,८०० ध्वनिक्षेपक आहेत. ही संख्या १० वर्षांपूर्वीच्या मानाने दुप्पट आहे. ह्यांपैकी ४५ टक्के ध्वनिक्षेपक उत्तर अमेरिकेत आहेत आणि २० टक्के युरोपात आहेत. ध्वनिक्षेपणासाठी लागणाऱ्या विजेच्या वापराच्या बाबतीत मात्र युरोपचा अनुक्रम पहिला आहे. ध्वनिक्षेपकांपैकी अवघे २७ टक्के ध्वनिक्षेपक आशिआ, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्या भूभागांतून आहेत. ह्यावरून त्यांचे मागासलेपण उघडच दिसत आहे. शिवाय ह्या भूभागातील ध्वनिक्षेपकांची शक्तीही कमी आहे. रेडिओसारख्या साधनाने सर्व जग अधिक जवळ आलेले असले तरी ज्ञानप्रसाराची आणि माहिती पसरविण्याची अधिक साधने प्रगत पाश्चात्त्य देशांजवळच अजूनही आहेत. परिणामी त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या जागतिक घटनांचा प्रसार त्यांच्या हितासंबंधीच्या दृष्टिकोणांतून साहजिकच करता येतो.

### जपानच्या मदतीने खताचे कारखाने

भारताचे पेट्रोल आणि रसायन खात्याचे मंत्री श्री. हुमायून कबीर ह्यांनी मुंबईमध्ये पत्रकारांशी बोलताना अशी माहिती सांगितली की, जपानच्या मदतीने दोन रासायनिक खताचे कारखाने काढण्यासाठी सध्या वाटाघाटी चालू आहेत. ते म्हणाले की, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात खाजगी मालकीच्या खत कारखान्यांतील उत्पादन अपेक्षेइतके झाले नाही. त्यामुळे खताची टंचाई उत्पन्न झाली. खाजगी मालकीच्या खत कारखान्यांना परदेशी कंपन्यांशी सहकार्य करताना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले. खताच्या वाटपाची व्यवस्था जितकी चोख असावयास पाहिजे होती तितकी ती नाही, ही गोष्ट खरी आहे. वाटपाबाबतची व्यवस्था अधिक सैल करण्याचा विचार चालू आहे. १९७० च्या सुमारास खताच्या पुरवठ्याची परिस्थिती सुधारेल आणि ते विनासायास मिळू शकेल असे वाटते.

### ५ किलोग्रॅम सोन्याचे सुवर्ण रोखे

भावनगर येथील एका नागरिकाने ५ किलोग्रॅम वजनाचे सोने देऊन त्याच्या बदला सुवर्णरोखे घेतले. आतापर्यंत एका व्यक्तीने एका मुठीने इतके सोने सुवर्ण रोख्यात गुंतविलेले नाही. ह्या व्यक्तीने आपले नावही जाहीर करण्यात येऊ नये अशी अट घातलेली आहे.

### विद्युत्निर्मितीच्या योजनांची मार्गदर्शक तत्त्वे

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस १·२७ कोटी किलोवॅट विजेचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. परंतु आज तरी अशी लक्षणे दिसत आहेत, की हे उद्दिष्ट गाठणे शक्य होणार नाही. चालू वर्षाच्या प्रारंभी वीजनिर्मितीच्या शक्यतेचा फेरविचार करण्यात येऊन उद्दिष्ट १·१ कोटी किलोवॅट ठेवण्यात आले. परंतु इतकीही वीज उत्पन्न न होण्याचा संभव आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात वीजनिर्मितीच्या योजनांवर २०० कोटी रुपये खर्च करण्यात यावयाचे आहेत. ह्या कार्यक्रमात वीजनिर्मितीत १·१ कोटी किलोवॅटची भर पडेल असा अंदाज आहे. ५ व्या पंचवार्षिक कार्यक्रमात १·५ ते १·७ किलोवॅट वीज निर्माण करण्याचा इरादा आहे. अर्थात त्यासाठी आजच्यापेक्षा खूपच मोठे प्रयत्न करावे लागतील. दरम्यान इतर अनेक प्रकारच्या विकास योजनांप्रमाणे वीजनिर्मितीच्या योजनांनाही परदेशीय चलनाच्या टंचाईची झळ लागण्याची शक्यता आहे. ४ थ्या पंचवार्षिक योजनेतील वीजनिर्मितीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून भारत सरकारने काही मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. वीजनिर्मितीच्या कामी परदेशीय सल्लागारांवर अवलंबून राहण्यात येऊ नये आणि जरूर त्या यांत्रिक साधनांची निर्मिती देशातच करण्यात यावी अशा सूचना राज्य सरकारला देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे ज्या योजनांची वाटचाल वरीच झाली आहे. त्या लवकर पूर्ण करण्यात याव्या, राज्यांतर्गत विजेची वाहतूक करणाऱ्या तारा त्वरित घालण्यात याव्या आणि ग्रामीण भागातील वीज पुरवठ्याचे काम अधिक तातडीने करण्यात यावे अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. सूचनांची कार्यवाही करण्यासाठी एक मध्यवर्ती केंद्र स्थापन झाले आहे.

### साखरेच्या धंद्यासाठी वेज बोर्डाची नेमणूक

साखरेच्या धंद्यासाठी श्री. भीमाशंकरन् ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक वेज बोर्ड नेमण्यात आले आहे. ह्या बोर्डावर मालकवर्गाचे दोन आणि कामगारांचे दोन प्रतिनिधी असतील. साखरेच्या धंद्याच्या गरजा, साखरेच्या निर्गतीची आवश्यकता आणि साखरेच्या धंद्याची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन वेतनाच्या प्रश्नांचा फेरविचार करणे, हे ह्या बोर्डाचे काम राहील. कामगारांना आपले कसब दाखविण्यास प्रोत्साहन मिळायला हवे, हेही बोर्डाने ध्यानात बाळगावयाचे आहे. हैदराबाद येथे बोर्डाची कचेरी राहील. पहिले वेज बोर्ड १९५७ साली नेमण्यात आले होते.

### श्री. दिवेकर ह्यांना रिझर्व्ह बँकेकडून निरोप

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर, श्री. सी. एस्. दिवेकर, ह्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्त रिझर्व्ह बँकेत निरोप समारंभ झाला. त्यावेळी, रिझर्व्ह बँकेचे अध्यक्ष श्री. भट्टाचार्य अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, "गेल्या तीन वर्षांत हिंदी बँकिंगचा पाया भक्कम करण्याचे श्री. दिवेकर ह्यांनी कार्य केले, तसे दुसऱ्या कुणास साधले असते, असे मला वाटत नाही." श्री. दिवेकर ह्यांना ६,००१ रु. ची थैली अर्पण करण्यात आली. ती रक्कम त्यांनी संरक्षण निधीस दिली.

**एअर इंडियाची गगनचुंबी इमारत**—एअर इंडिया इंटरनॅशनल ही विमान वाहतूक कंपनी मुंबई येथे अमेरिकेतल्याप्रमाणे एक गगनचुंबी इमारत बांधणार आहे. अशा प्रकारची इमारत बांधण्याचा अगर तिचा आराखडा करण्याचा अनुभव हिंदी तंत्रज्ञांना नाही. म्हणून एका अमेरिकन कंपनीचा सल्ला घेण्यात येणार आहे. कंपनीची फी १½ लाख डॉलर्स आहे. इमारतीसाठी सुमारे ४ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**चहाचे फाजील उत्पादन**—इंडियन टी असोसिएशनच्या आसाम शाखेच्या अध्यक्षांनी असा इशारा दिला आहे की, जगात चहाचे भरमसाठ उत्पादन होण्याची शक्यता असून हा काल फारसा दूर नाही. आफ्रिकेत चहाची लागवड करण्यासाठी योग्य अशा प्रकारच्या जमिनीला मर्यादाच नाही. त्याचा फायदा घेऊन आफ्रिकेत फार मोठ्या जमिनीत चहाची लागवड करण्यात येत आहे. चहाच्या धंद्यातील नफ्याविषयी त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

**इराणचा तेलपुरवठा चालू होता**—भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान लष्करी संघर्ष चालू असताना सुद्धा इराणकडून भारताला होणाऱ्या तेलाच्या पुरवठ्यात खंड पडलेला नव्हता. भारतात दरसाल ४५ लाख टन अशुद्ध तेलाचे उत्पादन करण्यात येते. वार्षिक गरज मात्र १·४ कोटी टनांची आहे. भारताचे तेल आणि नैसर्गिक वायुमंडळ तेलाच्या शोधांचे प्रयत्न जारीने करीत आहे. गुजरातमधील तेलखाणींतून रोज ४,५०० टन अशुद्ध तेल काढण्यात येते.

**रणगाड्यांची चाचणी**—मद्रास येथील कारखान्यात तयार होणाऱ्या रणगाड्यांची यांत्रिक तपासणी करण्यासाठी भारत सरकारने एका ब्रिटिश कारखान्याकडून ९० हजार पौंडांची उपकरणे मागविली आहेत. मद्रास येथे काढण्यात यावयाच्या नव्या रणगाड्यांच्या कारखान्यात ह्या उपकरणांचा उपयोग करण्यात येईल. युद्धात निर्माण होणाऱ्या परिस्थितीत रणगाडे कसे काय काम देतील ह्याची चाचणी कारखान्यात करणे त्यामुळे शक्य होणार आहे.


## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७१९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

(१) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
(२) त्रैवार्षिक मासिक बचत — ,, ३॥ ,,
(३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटे — ,, ५ ,,

*मुदतीच्या आकर्षक दरांसंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## सरदारगृह


**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपलड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग - सांगली ( महाराष्ट्र )

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.